# ९. घर

- ऐका. म्हणा. वाचा.



घर नाही चार भिंती
घर असते देखण्या कृती,
घर नाही एक वस्तू
घर म्हणजे आनंदी वास्तू.

घर नाही नुसत्या खोल्या
घरात हव्या भावना ओल्या,
घरात हवा जिव्हाळा
घर शिक्षणाची पहिली शाळा.



घर नाही नुसता पसारा
घर नाही केवळ निवारा,
घराला असते कहाणी
घराला असतो आपला चेहरा.

घर शिकवते पाहायला
चालायला, धावायला,
घर शिकवते लढायला
दु:खाचा डोंगर चढायला.



घराने असावे सावधान
घराने द्यावे समाधान,
घराने ठेवावे काळाचे भान
जवळ करावीत नवी मूल्ये, नवीन ज्ञान.

घरात आईचे अपार कष्ट
आजी सांगते सुंदर गोष्ट,
घरात आजोबा गप्पिष्ट
आईच्या हातचे जेवण चविष्ट.

**– धुंडिराज जोशी**

शब्दार्थ : **देखण्या** – सुंदर. **वास्तू** – इमारत. **ओल्या भावना** – प्रेमळ भावना. **जिव्हाळा** – प्रेम. **दु:खाचा डोंगर चढणे** – दु:खाला सामोरे जाणे. **जवळ करणे** – स्वीकारणे. **अपार** – अमाप. **गप्पिष्ट** – गप्पा करणारे. **चविष्ट** – चव असलेले.



## स्वाध्याय

**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**


(अ) माणसाची पहिली शाळा कुठे सुरू होते?

(आ) घराने कोणत्या गोष्टी जवळ कराव्यात?

(इ) आईच्या हातचे जेवण कसे असते?

**प्र. २. कवीने घराचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ते लिहा.**

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**




**प्र. ४. शब्दातील शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द कवितेतून शोधा व लिहा.**

(१) वस्तू (२) खोल्या (३) जिव्हाळा (४) पसारा (५) पाहायला

(६) सावधान (७) भान (८) गोष्ट (९) चविष्ट

**प्र. ५. योग्य पर्याय निवडा.**

(अ) घरात हव्या भावना ओल्या–म्हणजे

(अ) घरातील व्यक्तींनी रडावे.

(आ) घरातील व्यक्तींनी परस्परांवर प्रेम करावे.

(इ) घरातील व्यक्तीत एक व्यक्ती भावना नावाची असावी.

(ब) घर शिक्षणाची पहिली शाळा–म्हणजे

(अ) घरामध्ये बालमंदिर भरते.

(आ) घरापासून शिक्षणाला सुरुवात होते.

(इ) घराच्या शाळेत नाव घातले जाते.

(क) जवळ करावीत नवी मूल्ये नवीन ज्ञान–म्हणजे

(अ) नवी मूल्ये व नवीन ज्ञानाच्या जवळ राहायला जावे.

(आ) रोज नवीन मूल्यांची व ज्ञानाची पुस्तके वाचावीत.

(इ) काळानुसार मूल्य व ज्ञानातील बदल स्वीकारावे.

**प्र. ६. तुमच्या परिसरातील घराला दिलेली नावे पाहा. यादी करा.**

**प्र. ७. खालील शब्द व त्यांचे अर्थ लक्षात ठेवा.**

(१) चविष्ट – चव असणारे.

(२) विशिष्ट – ठरावीक प्रकारचा.

(३) भ्रमिष्ट – भ्रम झालेला.

(४) गप्पिष्ट – गप्पा मारणारा.


(५) कोपिष्ट – रागावणारा.


(६) अनिष्ट – योग्य नसलेले.

प्र. ८. खालील शब्दांचे लिंग ओळखा व वचन बदला.

| शब्द | लिंग | वचन |
|---|---|---|
| उदा., घर | नपुंसकलिंगी | घरे |
| भिंत | स्त्रीलिंगी | भिंती |
| चेहरा | पुल्लिंगी | चेहरे |
| निवारा | | |
| आई | | |
| डोंगर | | |
| हवा | | |
| आजोबा | | |

प्र. ९. खालील शब्द शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.




प्र. १०. खालील शब्द वाचा. लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| सूर्य | चक्र | राष्ट्र | वाऱ्यावर |
| कार्य | खग्रास | महाराष्ट्र | साऱ्यांचा |
| पूर्व | प्रकाश | सौराष्ट्र | कोऱ्या |
| सर्व | तक्रार | राष्ट्रध्वज | ताऱ्यांना |
| कर्क | आम्र | राष्ट्रीय | चाऱ्याला |

प्र. ११. वस्तू आणि वास्तू या दोन शब्दांतील लेखनामध्ये फक्त 'काना' दिल्याने फरक पडतो; परंतु अर्थामध्ये खूप फरक आहे. खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ शोधा. लिहा.

उदा., (१) वस्तू - जिन्नस, नग (२) वास्तू - घर


(१) कप-काप (२) तार-तारा (३) खरे-खारे (४) गर-गार

(५) घर-घार (६) चार-चारा (७) पर-पार (८) वर-वार

प्र. १२. तुमच्या घराचे चित्र काढून रंगवा व त्याचे सहा-सात वाक्यांत वर्णन करा.

- **चित्राच्या जागी योग्य शब्दाचा वापर करून खालील म्हणी पूर्ण करा.**

(१) पाण्यात राहून  वैर करू नये.

(२) वासरात लंगडी  शहाणी.

(४) अडला हरी  पाय धरी

- **खालील चित्रांचा सहसंबंध लावून गोष्ट तयार करा.**





